# घटक – ४
# वाक्यविचार

## ४.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- पदबंध व वाक्याचे स्वरूप समजावून घेता येतील.
- वाक्य व वाक्याचे प्रकार समजावून घेता येतील.
- वाक्याचे पृथःक्करण म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.

## ४.२ प्रस्तावना

स्वप्न-स्वनिम-स्वनांतर आणि पद-पदिम-पदांतर या संकल्पना समजावून घेतल्यानंतर त्याचा पुढचा टप्पा हा वाक्यविचाराचा येतो. कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना वाक्यविचार ही तितकाच महत्त्वाचा आहे. कारण भाषिक संदेशनाचे कार्य हे वाक्यानेच चालते. त्यामुळे वाक्यविचार हा शेवटचा टप्पा म्हणून त्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे. कारण पदविन्यासात पद, त्याचे प्रकार व त्यापासून होणारी शब्दघटना पुढच्या रचनांचा म्हणजे शब्दबंध, उपवाक्ये आणि वाक्य या रचनांचा विचार होतो. पदविन्यासात शब्दांच्या आंतरिक रचनेचा विचार होतो. तर वाक्यविचारात शब्दांच्या मांडणीचा विचार होतो.

वाक्यविचारात वाक्यातील पदिमांच्या द्वारे वाक्यांची विशिष्ट क्रमाने रचना कशी केली जाते. याचे स्पष्टीकरण येते. वाक्य विचाराला 'वाक्यविन्यास' अशीही संज्ञा वापरली जाते.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ पदबंधाचे स्वरूप

वाक्यामध्ये शब्दबंध, उपवाक्य हे घटक येतात. तर शब्दबंध, उपवाक्य आणि वाक्य यांनी भाषा तयार होत असते. पण हे सारे घटक सार्थ व विघटनक्षम असतात. पद हे सर्वांत लहान भाषिक रूपातून शब्दबंध तयार होतात. शब्द हे पदिमापेक्षा मोठे असतात. त्यात कधी कधी एकापेक्षा अधिक पदे अथवा पदिम असल्याने तो रचना या प्रकारात मोडतो. शब्दांचे संघटक म्हणजे पदे अथवा पदिम हे होत. शब्द हाही वरच्या रचनेचा म्हणजे शब्दबंधाचा संघटक आहे. शब्दबंध हा उपवाक्याचा संघटक आहे. उपवाक्य हे वाक्याचा संघटक आहे, अशा तऱ्हेने पदाच्या वरच्या सर्व रचना संघटकांच्या दृष्टीने रचना असून वरच्या रचनेच्या दृष्टीने संघटक असतात.



Scanned with OKEN Scanner

शब्दांची पुढची रचना म्हणजे पदबंध होय. जेव्हा शब्द विशिष्ट अर्थाने आणि रचनातत्त्वाने एकमेकांशी जुळतात तेव्हा पदबंध तयार होतो. 'व्याकरणिक आणि आशयाच्या परस्परसंबंध असलेल्या घटकांचा जो समूह त्याला पदबंध/शब्दबंध किंवा रूपबंध असे म्हणतात. पदबंधाच्या स्वरूपाबाबत आंतरिक स्थैर्य व बाह्य स्वातंत्र्य या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**१. आंतरिक स्थैर्य** : शब्दबंधामधील शब्द हे एकमेकांशी एका विशिष्ट रचनातत्त्वानुसार घट्टपणे जोडलेले असतात. ते शब्द कसेतरी मागे-पुढे करता येत नाहीत.

उदा. गर्भश्रीमंत एक खानदानी - खानदानी एक गर्भश्रीमंत.

वरील वाक्यात शब्दांच्या क्रम बदल अपेक्षित नाही. यालाच आंतरिक स्थैर्य म्हणतात.

**२. बाह्य स्वातंत्र्य** : पण वाक्यांना बाह्य स्वातंत्र्यही असते.

उदा. 'एक खानदानी गर्भश्रीमंत' असा बदल चालू शकतो.

'ती घरातून रोज सकाळी सात वाजता निघते'

या वाक्यात 'ती रोज सकाळी सात वाजता घरातून निघते' किंवा

'रोज सकाळी सात वाजता ती घरातून निघते' असा बदल करता येतो.

यालाच बाह्य स्वातंत्र्य असे म्हणतात.

शब्दाप्रमाणे शब्दबंधाचेही नामशब्दबंध, विशेषण शब्दबंध, क्रियाविशेषण शब्दबंध, क्रियापद शब्दबंध' असे प्रकार पडतात.

उदा. १. तेव्हा **आकाशस्थ लाखो देवतांनी** कर्णावर पुष्पवृष्टी केली. - नामशब्दबंध

२. **प्रचंड गतीने भोवंडणारे** विश्वचक्र कुणालाही आश्चर्यचकीत करील. - विशेषण शब्दबंध

३. ती **गप्पा मारीत होती.** - क्रियापदशब्दबंध

४. **रस्त्याच्या पलिकडच्या बाजूला** बोराचे झाड आहे. - क्रियाविशेषण शब्दबंध.

### १.२.२ वाक्य

शब्दबंधानंतरची पुढची पायरी म्हणजे वाक्य होय. काही भाषाभ्यासक त्याला उपवाक्य असेही म्हणतात. पण उपवाक्य व वाक्य यामध्ये रचनेच्या दृष्टीने कोणताच फरक नसतो. म्हणजेच उपवाक्य हे वाक्यच असते. ते कधीही स्वतंत्रपणे येऊ शकत नाही.

वाक्य म्हणजे सार्थ शब्दसमूह. वाक्यातून कोणता तरी आशय किंवा अर्थ व्यक्त होत असतो. वाक्य म्हणजे केवळ शब्दांची योग्य क्रमाने रचना नव्हे. तर त्यातून आशय, अर्थ, भावना, विचार व्यक्त करणारी रचना असते.



Scanned with OKEN Scanner

**वाक्यांच्या व्याख्या**

१. 'एक पूर्णविचार भाषेत व्यक्त करणाऱ्या शब्दसमुच्चयास वाक्य म्हणतात' - मो. के. दामले

२. 'उच्चारणातील दुसऱ्या कोणत्याही मोठ्या रचनेचा भाग नसलेली रचना म्हणजे वाक्य' ब्लूमफिल्ड

३. 'रचनेमध्ये दुसऱ्या कोणत्याही मोठ्या व्याकरणिक रूपाचा भाग नसलेले व्याकरणिक रूप म्हणजे वाक्य'- हॉकेट.

वरील व्याख्यांवरून सार्थ शब्दसमूह म्हणजे वाक्य अशी सर्वसमावेशक व्याख्या होते. वाक्य व्याकरणांच्या नियमांनी बांधलेले असते. कर्ता, कर्म, क्रियापद, लिंग, वचन, विभक्ती, काळ व अर्थ यानुसार वाक्याची रचना होत असते. ही रचना स्वतंत्र, स्वयंपूर्ण व अर्थपूर्ण असते. श्री. न. गजेंद्रगडकर यांनी आपल्या 'भाषा व भाषाशास्त्र' या ग्रंथात काही संज्ञा वापरल्या आहेत त्या पुढीलपमाणे :

**१. सार्थता** : वाक्यामधील शब्द सार्थ हवेत.

**२. सामर्थ्य** : वाक्यामधील शब्दांना योग्यता म्हणजे अर्थबोध असावा.

उदा. तो विस्तवाने प्रोक्षण करतो.

या वाक्यात व्याकरणिक नियम असले तरी अर्थदृष्ट्या ते अयोग्य आहे.

**३. आकांक्षा** : वाक्यातील शब्दांना आकांक्षा असायला हवी म्हणजे वाक्याचा सुसंगत अर्थ, त्यातील शब्दांवर अवलंबून असतो व त्यामुळे त्यातील काही शब्दांच्या अभावी तो प्राप्त होणार नाही.

उदा. राम गावाला जातो.

या वाक्यातील तिन्ही शब्द एकमेकांवर अवलंबून आहेत. म्हणजे वाक्यातील प्रत्येक शब्दाला दुसऱ्या सार्थ व अन्वीत शब्दाची अपेक्षा असते.

**४. अन्विती** : वाक्यामधील शब्दांची व्याकरणाच्या दृष्टीने असलेली अनुरूपता म्हणजे अन्विती. वाक्यातील प्रत्येक शब्दाचे रूप त्या वाक्याच्या लिंग, वचन, पुरूष, विभक्ती, काळ अर्थ यांच्यानुसार योग्य त्या प्रकारचे असावे लागते.

### १.२.३ वाक्यरचना

शब्दांच्या पुढच्या रचना म्हणजे शब्दबंध उपवाक्य आणि वाक्य आहेत. पदापासून वाक्यापर्यंत अनेक प्रकारची भाषिक रूपे भाषेत असतात. यापैकी पद सोडून इतर सर्व भाषिक रूपे विघटनक्षम असतात. म्हणजे ती वेगवेगळ्या सार्थ घटकांनी बनलेली असतात. ज्या ज्या भाषिक रूपाचे असे संघटक दाखविता येतील त्या त्या रूपाला रचना म्हणतात. पद म्हणजे सर्वात लहान असे भाषिक रूप होय. पद किंवा पदिमाचे विघटन होत नाही. म्हणजे पद किंवा पदिम ही रचना नसते. पदिमाला संघटक नसल्याने ती रचना होत नाही.



Scanned with OKEN Scanner

पदिमाच्या पुढच्या रूपाला मात्र संघटक असतात. शब्द हा पदिमाच्या पुढचे रूप आहे. शब्दात एकापेक्षा अधिक पदे असल्याने तो रचना या प्रकारात येतो. म्हणजेच शब्दांच्या संघटकांना पद किंवा पदिम म्हणतात. शब्द हाही वरच्या रचनेच्या म्हणजे शब्दबंधाचा संघटक आहे. शब्दबंध हा उपवाक्याचा अथवा वाक्याचा संघटक आहे. उपवाक्य हे वाक्याचा संघटक आहे. अशा तऱ्हेने पदाच्या वरच्या सर्व रचना खालील संघटकांच्या दृष्टीने रचना असून वरच्या रचनेच्या दृष्टीने संघटक असतात. वाक्य मात्र दुसऱ्या कोणत्याही रचनेचे संघटक नसते म्हणून 'वाक्य ही उच्चारणातील सर्वात मोठी रचना असते.'

वाक्य (संघटक नाही)
↑
उपवाक्य (संघटक)
↑
शब्द (संघटक)
↑
पद/पदि
↑
स्वन/स्वनिम

### १.२.४ प्रथमोपस्थित संघटक

प्रथमोपस्थित संघटक म्हणजे त्या रचनेला प्रत्यक्षपणे जबाबदार असलेले संघटक होत. कोणत्या रचनेचे पहिल्या टप्प्याला जे संघटक होतात ते **तिचे प्रथमोपस्थित संघटक** किंवा अव्यवहित संघटक होत. ज्या संघटकांचे पुढे विश्लेषण किंवा विघटन शक्य नसते ते त्या रचनेचे **अंतिम संघटक** असतात.

उदा. त्या घरातील सर्वात जास्त शिकलेला मुलगा हुषार आहे.

↓

| त्या घरातील सर्वात जास्त | शिकलेला मुलगा हुषार आहे. |
|---|---|
| [(तो) (घर, त, ईल) (सर्वात) (जास्त)] | [(शिक, लेल, आ) (मुलग, आ) (हुषार) (अस, हे)] |

असे संघटक दाखविताना पदबंधातील पदांचा काळजीपूर्वक विचार करावा लागतो. कोणत्या पदाचा कोणत्या पदाशी संबंध आहे हे पहावे लागते.

उदा. भांडखोरपणा


भांडखोर — पण

भांड — खोर

'भांडखोरपणा' यात भांड+खोर+पणा असे तीन संघटक आहेत. या व्यतिरिक्त त्याचे विघटन होऊ शकत नाही. यात 'भांड' व 'खोर' हे दोन संघटक एकत्रित आले व नंतर 'पणा' हा संघटक त्याला जोडला गेला म्हणून 'भांडखोर+पणा' अशी रचना होते.

कोणत्याही रचनेचा असा टप्प्याटप्प्याने विचार करावा लागतो.

उदा.




वरील उदाहरणावरून असे म्हणता येईल की कोणत्याही रचनेचे पहिल्या टप्प्याला जे संघटक होतात ते तिचे प्रथमोपस्थित संघटक किंवा अव्यवहित संघटक होत. प्रथमोपस्थित संघटक म्हणजे त्या रचनेला प्रत्यक्षपणे जबाबदार असलेले संघटक होत.

प्रथमोपस्थित संघटक शोधण्याच्या या पद्धतीमुळे संघटकांचे परस्परसंबंध कळतात, संघटकांचे रचनेतील स्थान अथवा महत्त्वही कळते, वाक्यातील अथवा रचनेतील संदिग्धता दूर होते. संघटक शोधताना काही पथ्ये पाळावी लागतात. ती पुढीलप्रमाणे -

१. रचनेचे आपण जे छेद करू ते सार्थ असले पाहिजेत.


उदा. अस्वाभाविक → अ + स्वाभाविक

२. त्या छेदाचे अर्थ मूळ रचनेशी सुसंगत असले पाहिजेत.

उदा. सभागृहात धूम्रपान **करू नये.**

सभागृहात धूम्रपान **करून ये.**

३. छेदाने दाखविलेल्या संघटकांच्या जागी दुसऱ्या प्रतिस्थापनक्षम अशा लहान रचना वापरता आल्या पाहिजेत. उदा. अस्वाभाविक = अ + स्वाभाविक




४. संघटकाचा जो रूपवर्ग असेल त्याच रूपवर्गातील शब्द प्रतिपादनक्षम म्हणून येईल. नामबंधाच्या ठिकाणी नामबंध क्रियापदबंधाच्या ठिकाणी क्रियापदबंधच येईल.



Scanned with OKEN Scanner

उदा. तांबडा सदरा घातलेला माणूस/मोठ्याने ओरडत आहे.

वेडा माणूस / ओरडत आहे.

५. प्रत्येक संघटक स्वतः पुरता स्वतंत्र कोणी एकसंघ असला पाहिजे म्हणजे एका संघटकाची जागा जर बदलायची झाली तर तो संबधच्या सबंध हलवावा लागतो.

उदा. वर्गात पहिला येणाऱ्या मुलाला हे बक्षीस मिळेल.

हे बक्षीस वर्गात पहिला येणाऱ्या मुलाला मिळेल.

काही संघटक **अतिरिक्त** असतात. त्यापैकी एक संघटक म्हणजे **शब्दांचा क्रम** होय.

उदा. स्थूल सरदाराची पत्नी.

सरदाराची स्थूल पत्नी

या वाक्यात संघटक तेच असले तरी क्रम बदलल्याने अर्थभेद होतो. तर दुसरा अतिरिक्त संघटक म्हणजे **सीमासंधी** लिखित रूपापेक्षा बोली रूपामध्ये हा महत्त्वाचा असतो.

उदा. वृद्ध पुरुष आणि स्त्रिया

या वाक्यामध्ये विशिष्ट प्रकारे उच्चार करून संदिग्धता दूर करता येते. कारण जर पुरुष आणि स्त्रिया दोन्ही वृद्ध असतील तर 'वृद्ध' शब्दानंतर थोडे थांबून मग 'पुरुष आणि स्त्रिया' उच्चारता येईल आणि फक्त पुरुषच असतील तर 'वृद्ध पुरुष' या उच्चारानंतर थोडे थांबून नंतर 'स्त्रिया' हा शब्द उच्चारावा लागेल.

### १.२.४ रचनांचे प्रकार

भाषेमध्ये आढळणाऱ्या रचनांचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. (अ) अन्तःकेंद्रिय रचना (ब) बहिःकेन्द्रीय रचना व संघटक यांच्या विनियोगाच्या आधारे ही वर्गीकरण पद्धती मानलेली आहे.

**१. अन्त:केन्द्रीय रचना** : रचना ज्या संदर्भात येऊ शकते त्याच संदर्भात तिचा एखादा संघटक येऊ शकत असेल तर ती रचना अन्त:केन्द्रीय रचना होय. याचाच अर्थ रचना आणि तिचा संघटक यांचे विनिमय सारखे असेल तर त्या रचनेला अन्तःकेन्द्रीय रचना म्हणतात.

उदा. मला **हिरवा पोपट** आवडतो.

या रचनेत हिरवा पोपट ही रचना अन्तःकेन्द्रीय आहे. कारण 'हिरवा पोपट' या रचनेच्या जागी तिचा संघटक 'पोपट' याचाही उपयोग होऊ शकतो.

**२. बहि:केन्द्रीय रचना** : जेव्हा रचनेचा विनिमय आणि तिच्या संघटकाचा विनिमय भिन्न-भिन्न असतात तेव्हा ती रचना बहिःकेन्द्रीय असते.

उदा. रमेश उठतो.



Scanned with OKEN Scanner

या रचनेचे प्रथमोपस्थित संघटक 'रमेश, उठतो' असे आहेत. हे दोन्ही संघटक एकत्रच येऊ शकतात. या दोन प्रकारचे भिन्न-भिन्न उपप्रकार आहेत. त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येतो.

### १.२.५ वाक्याचे प्रकार

वाक्याचे अर्थानुरूप व रचनेच्या दृष्टीने असे दोन प्रकार केले जातात.

**(अ) अर्थानुरोधाने प्रकार :**

१. **विधानार्थी वाक्य** : ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते.

   उदा. माझे वडील आज परदेशात गेले.

२. **प्रश्नार्थी** : ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो.

   उदा. तुम्ही शाळेत कधी जाणार आहात ?

३. **उद्‌गारार्थी** : ज्या वाक्यात भावनेचा उद्‌गार काढलेलं असतो.

   उदा. अबब ! केवढी प्रचंड आग ही !

४. **होकारार्थी व नकारार्थी** : काही वाक्ये होकारार्थी असतात.

   उदा. राम अभ्यास करतो.

   तर काही वाक्यांतून नकार येतो.

   उदा. शाम कधीच अभ्यास करीत नाही.

   हे वाक्य नकारार्थी होते.

होकारार्थी वाक्यांना 'करुणरूपी' व नकारार्थी वाक्यांना 'अकरणरूपी' वाक्ये म्हणतात.

वाक्यातील क्रियापदांवरून काही प्रकार पडतात.

१. **स्वार्थी वाक्य** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून नुसताच काळाच बोध होतो.

   उदा. मुले घरी गेली / जातात - जातील.

२. **आज्ञार्थी वाक्य** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा, आशीर्वाद, प्रार्थना, विनंती किंवा उपदेश या गोष्टीचा बोध होतो.

   उदा. परमेश्वरा, माझं भलं कर.

३. **विध्यर्थी वाक्य** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींचा बोध होतो.

   उदा. मुलांनी शिक्षकांच्या सूचनांचे पालन करावे.



Scanned with OKEN Scanner

४. **संकेतार्थी** : वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून अमूक केले असते तर अमूक झाले असते अशी अट किंवा संकेत याचा अर्थ निघतो.

उदा. पाऊस पडला असता तर हवेत गारवा असता.

**(ब) रचनेनुसार वाक्याचे प्रकार**

एका वाक्यात किती विधाने असतात. त्यावरून वाक्यांचे तीन प्रकार पडतात.

**१. केवल वाक्य** : ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच विधेय असते. त्यास केवल किंवा शुद्ध वाक्य म्हणतात.

उदा. **आम्ही** आमच्या गावी **जातो.**

**बाजीप्रभू** प्रयत्नांची शर्थ करून धारातीर्थी **पडले.**

वरील वाक्यात आम्ही, बाजीप्रभू हे एकच उद्देश तर जातो, पडले ही विधेये आहेत.

काही वेळेला ही केवलवाक्ये साधे, विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी, नकारार्थी अशी असू शकतात.

**२. मिश्रवाक्य किंवा संमिश्र वाक्य** : ज्या वाक्यामध्ये एक मुख्य विधेयक व एक मुख्य उद्देश असून दोन किंवा अधिक उपवाक्ये असतात. त्याला मिश्र वाक्य असे म्हणतात.

उदा. जर तुला उद्योग असता, तर तू रिकामटेकडा फिरला नसतास.

संमिश्र वाक्यात एक प्रधान उद्देश व एक प्रधान विधेय असून एक किंवा एकापेक्षा अधिक उद्देश्य व विधेय दुय्यम म्हणून आलेली असतात. प्रधान उद्देश, विध्येय असलेल्या वाक्याला **प्रधान वाक्य** व इतर वाक्यांना **दुय्यम किंवा गौण** वाक्ये म्हणतात.

गौण वाक्ये तीन प्रकारची असतात.

**(अ) नामवाक्य** : केवळ वाक्यात ज्या ठिकाणी नामपदबंध येतो, त्या त्या ठिकाणी येणारे वाक्य. ही खालीलप्रमाणे येतात.

उदा. **तुम्ही** बोलता हे योग्य आहे - कर्ता/उद्देश

**पुस्तक वाच** असे ती म्हणाली. - कर्म

**(ब) विशेषण वाक्य** : केवल वाक्यात ज्या ज्या ठिकाणी विशेषण येते त्या त्या ठिकाणी येणारे वाक्य.

उदा. **जे** विद्यार्थी अभ्यास करतात, **ते** परीक्षेत यशस्वी होतात. (कर्ता उद्देश विस्तारक)

**जो** नोकर पूर्वी आमच्याकडे होता **त्याला** मी आज ऑफिसात पाहिला. (कर्म विस्तारक)



Scanned with OKEN Scanner

**(ड) क्रियाविशेषण वाक्य** : केवल वाक्यात ज्या ज्या ठिकाणी क्रिया विशेषण येते त्या त्या ठिकाणी येणारे वाक्य क्रियाविशेषण वाक्य होय.

ही वाक्ये वाक्यामध्ये विधेयविस्तारक म्हणून येतात. क्रियाविशेषण वाक्ये ही स्थल, काल, रीति, संख्या, परिणाम, कार्यकारणवाचक इ. प्रकारची असू शकतात.

उदा. तुम्ही जेथे जायला सांगाल, तेथे तो येईल.

**३. संयुक्त वाक्य** : ज्या वाक्यामध्ये संमिश्र किंवा केवल वाक्यांचा संयोग झालेला असतो त्याला संयुक्त वाक्य असे म्हणतात.

संयुक्त वाक्यामध्ये एकापेक्षा अधिक प्रधान उद्देश्ये व एकापेक्षा अधिक प्रधान विधेये असतात. संयुक्त वाक्यामधील ही वाक्ये एकमेकांशी उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.

**उभयान्वयी अव्यये** : समुच्चयवाचक (आणि, व, आणखी) विकल्पवाचक (वा, अथवा, अगर), न्यूनत्ववाचक (पण, परंतु, बाकी) परिणामवाचक (सबब, म्हणून, यास्तव)

उदा. ती आली, तिने पाहिले **आणि** तिने जिंकले.

तो येईल **किंवा** येणार नाही.

संयुक्त वाक्याचे प्रकार : (अ) केवल संयुक्त (केवल+केवल)

(ब) मिश्रसंयुक्त (मिश्र+मिश्र)

(क) केवलमिश्र संयुक्त (केवल+मिश्र)

## १.२.६ वाक्याचे पृथक्करण

पारंपरिक व्याकरणात वाक्य पृथक्करण व प्रथमोपस्थित संघटकाने केलेले पृथक्करण यात फरक दिसून येत नाही. वाक्यातील प्रथमोपस्थित संघटक हणजे वाक्यातील उद्देश आणि विधेय होय. उद्देशाचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूल उद्देश आणि उद्देशविस्तार. प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूळ विधेय (क्रियापद) आणि विधेयविस्तार होय.

वाक्याचेच वाक्यपृथक्करण करता येते. पण मराठी भाषेत अशी काही वाक्ये येतात की आशय वाक्याचा असतो पण रचना मात्र वाक्याची नसते.

उदा. तू गावाला जाशील का ? ''हो''

येथे ''मी गावाला जाईन'' असा आशय असला तरी रचना मात्र 'हो' या एका शब्दाची आहे. अशा वाक्याचे पृथक्करण करता येत नाही. कारण या वाक्यात उद्देश नसून फक्त विधेय आहे. याचा अर्थ असा की, अर्थपूर्ण व संदर्भरहित वाक्य म्हणजे ज्या वाक्यात उद्देश व विधेय हे घटक आहेत अशाच वाक्याचे पृथक्करण करता येते.



Scanned with OKEN Scanner

वाक्याचे पृथक्करण करताना उद्देश व विधेय हे महत्त्वाचे घटक आहेत. **उद्देश म्हणजे कर्ता.**

**कर्ता** – म्हणजे क्रिया करणारा.

**विधेय –** म्हणजे क्रियापद.

वाक्यामध्ये इतर जे शब्द येतात ते फक्त उद्देश व विधेयाच्या विस्तारासाठी / स्पष्टीकरणासाठी आलेले असतात म्हणून त्यांना उद्देश्यविस्तार आणि विधेयविस्तार असे म्हणतात.

वाक्यामध्ये जे शब्द येतात त्या शब्दांची अनेक रूपे वापरली जातात. ती रूपे कर्ता, कर्म, क्रियापद, विभक्ती आख्यान (काळ व अर्थ) लिंग, वचन, पुरुष, विभक्ती याआधारे वापरलेली असतात.

**(अ) उद्देश्य (कर्ता)** : कर्ता हा वाक्यातील महत्त्वाचा घटक असतो. त्याच्याशिवाय क्रियाच पूर्ण होत नाही. कर्ता दोन प्रकारचा असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष.

**प्रत्यक्ष कर्ता** : हा वाक्यातील क्रियेत प्रत्यक्षपणे येतो.

**उदा. सीता** अभ्यास करते.

**राम** गावाला जातो.

**तो** खूप अभ्यास करतो.

वरील वाक्यात 'सीता, राम' ही नामे आहेत तर 'तो' हे सर्वनाम आहे.

**अप्रत्यक्ष कर्ता** : कर्ता क्रियेला प्रत्यक्षपणे जबाबदार नसतो. क्रिया त्याच्या ठिकाणी घडत असते. त्यावेळी त्याला अप्रत्यक्ष कर्ता म्हणतात.

उदा. **अमितला** आंबे आवडतात.<br>**त्याला** दूध पाहिजे.

(कर्ता क्रियेठिकाणी प्रत्यक्ष नाही)

वाक्यात उद्देश नेहमी एकेरी शब्दाच्याच रूपाने येतो असे नाही. कधी कधी उद्देश्याला जोडून एक किंवा अनेक शब्द जोडून येतात. त्यांना उद्देश्य विस्तारक म्हणतात. म्हणजे उद्देशवाचक शब्दाचे विशेषण अथवा विशेषणबंध होय.

उदा. **शहाणा** मुलगा रडत नसतो.

**(ब) विधेय (क्रियापद)**

वाक्यातला दुसरा भाग म्हणजे विधेय म्हणजेच क्रियापद किंवा क्रियाबंध होय. ते दोन प्रकारे असते.

**एकेरी क्रियापद** – रमेश **बसतो.**

**संयुक्त क्रियापद –** रमेश **बसला** आहे.



Scanned with OKEN Scanner

संयुक्त क्रियापदामध्ये एक क्रियापद मुख्य क्रियेचे वाचक असून दुसरे क्रियापद सहाय्यक असते. वरील उदाहरणातील 'आहे' हे सहाय्यक क्रियापद आहे.

वाक्यपृथक्करणाची प्रक्रिया फक्त उद्देश्य व विधेयाने पूर्ण होत नाही. त्यासाठी इतरही शब्द येतात. त्यातील काही शब्दांचा गट विधेय विस्तारक म्हणून येत असतो. विधेय विस्तारक म्हणजे क्रियाविशेषण किंवा क्रियाविशेषणबंध होय.

उदा. तो **मोठ्याने** ओरडतो. (विधेय विस्तारक क्रियाविशेषणबंध)

विधेय विस्तारकांच्या जोडीला इतर आणखी शब्द येतात. ते **शब्द विधेयपुरके** असतात. मराठीत तीन प्रकारची विधेयपुरके असतात. (अ) आधारपूरक (ब) कर्मपूरक (क) विधिपूरक.

**(अ) आधारपूरक** : उदा. तो **पुण्याला** गेला.

श्याम **गावात** जातो.

वरील उदाहरणातील पुण्याला, गावात हे आधारपूरके आहेत. त्यांच्याद्वारे क्रियेचा आधार स्पष्ट होतो.

**(ब) कर्मपूरक** : काही क्रियापदे ही सकर्मक व अकर्मक असतात. क्रियापदांना कर्माची आवश्यकता असते.

**कर्म** – क्रिया ज्याच्यावर घडते. ते कर्म. काय, कुणाला हे प्रश्न विचारल्यास येणारे उत्तर म्हणजे **कर्म.** कर्म दोन प्रकारचे असतात. एक प्रत्यक्ष कर्म व दुसरा अप्रत्यक्ष कर्म.


उदा. राम **आंबा** खातो. – प्रत्यक्ष कर्म

डॉक्टर **रोग्याला** तपासतात. – अप्रत्यक्ष कर्म.

**(क) विधिपूरक** : अस्तित्ववाचक (आहे, असतो) स्थित्यंतर वाचक (हो, बन) अशा क्रियापदांच्या अर्थपूर्णतेसाठी त्यांचा उपयोग होतो.

उदा. नीता **शिक्षिका** आहे. – विधिपूरक

विधिपूरक म्हणजे कर्त्याहून भिन्न अशी वस्तू किंवा व्यक्ती नसते तर कर्त्याचेच ते भिन्न रूप अथवा स्थित्यंतर असते.



### १.२.७ समारोप

वाक्याचा विचार हा शब्दांच्या विचारानंतरची पायरी आहे. एका शब्दाचा विचार रूपमविन्यासात केलेला असतो. तर एका पेक्षा अधिक शब्दांचा व त्यांच्यातील रचनांचा विचार वाक्यविचार किंवा वाक्यविन्यासात केलेला/असतो. एकापेक्षा अधिक शब्द येताच त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध व त्यांच्यातून व्यक्त होणारी रचना ही वाक्यविन्यासात महत्त्वाची ठरते. जशी वाक्यामध्ये रचना असते तशीच शब्दामध्ये रचना असते. रचनेच्या आधारे शब्दाचे विघटन रूपिमांमध्ये करता येते. पण शब्दामधील रचनेचा विचार वाक्यविन्यासाच्या कक्षेत येत नाही.

### १.२.८ स्वाध्याय

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. शब्दबंध, उपवाक्य आणि कोणत्या घटकाने भाषा तयार होते ?

(अ) वाक्य (ब) प्रयोग (क) विभक्ती (ड) समास.

२. शब्दाची पुढची रचना कोणती असते ?

(अ) वाक्य (ब) पदबंध (क) भाषा (ड) स्वन

३. 'एक पूर्ण' विचार भाषेत व्यक्त करणाऱ्या शब्दसमुच्चयास वाक्य म्हणतात. अशी वाक्याची व्याख्या कोणी केली आहे ?

(अ) हॉकेट (ब) ब्लूमफिल्ड (क) मो. के. दामले (ड) सोस्यूर

४. 'भाषा व भाषाशास्त्र' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?

(अ) कृ. पा. कुलकर्णी (ब) मो. के. दामले

(क) श्री. न. गजेंद्रगडकर (ड) प्र. न. जोशी

५. ज्या संघटकांचे पुढे विश्लेषण किंवा विघटन शक्य नसते ते त्या रचनेचे काय असतात ?

(अ) अंतिम संघटक (ब) प्रथम संघटक

(क) अतिरिक्त संघटक (ड) प्रथमोपस्थित संघटक

६. जेव्हा रचनेचा विनिमय आणि तिच्या संघटकाचा विनिमय भिन्न भिन्न असतात तेव्हा ती रचना कशी असते ?

(अ) अन्तःकेन्द्रीय (ब) बहिःकेन्द्रीय

(क) विधानार्थी (ड) प्रश्नार्थी



Scanned with OKEN Scanner

७. ज्या वाक्यातून प्रश्न विचारला जातो ते वाक्य कोणत्या प्रकारचे असते ?

(अ) प्रश्नार्थी (ब) विधानार्थी (क) उद्‌गारार्थी (ड) होकारार्थी

८. ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच विधेय असते. त्या वाक्यास काय म्हणतात ?

(अ) मिश्र वाक्य (ब) संयुक्त वाक्य

(क) केवल वाक्य (ड) गौण वाक्य

९. वाक्याचे पृथक्करण करताना उद्देश व कोणता घटक महत्त्वाचा असतो ?

(अ) विधेय (ब) वचन (क) आख्यान (ड) अर्थ

१०. वाक्यातील क्रिया करणाऱ्या शब्दाला काय म्हणतात ?

(अ) कर्म (ब) कर्ता (क) क्रियापद (ड) वचन.

**उत्तरे** : १-अ, २-ब, ३-क, ४-क, ५-अ,

६-ब, ७-अ, ८-क, ९-अ, १०-ब.

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. पदबंध व वाक्याचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

२. वाक्याचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**(क) लघुत्तरी प्रश्न**

१. वाक्याचे पृथक्करणाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

२. प्रथमोपस्थित संघटक संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

३. वाक्याचे अर्थानुरोधाने पडणारे प्रकार स्पष्ट करा.

**(ड) टीपा लिहा.**

१. केवल वाक्य व मिश्र वाक्य

२. पदबंधाचे स्वरूप

३. उद्देश व विधेय



Scanned with OKEN Scanner

## १.९ संदर्भ ग्रंथ


१. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान - डॉ. कदम महेंद्र

२. भाषा व भाषाशास्त्र : गजेंद्रगडकर श्री. न.

३. मराठीचा भाषिक अभ्यास : कानडे मु. श्री.

४. मराठी व्याकरण परिचय : हिरेमठ राजशेखर

५. भाषाविज्ञान परिचय : कुबेर, कुलकर्णी

६. वर्णनात्मक भाषा विज्ञान : गोविलकर लीला

७. सुगम मराठी व्याकरण लेखन - वाळंबे मो. रा.


*-*-*



Scanned with OKEN Scanner